# प्रेरणा   Prerana

**को-ऑप बँक लि.   CO-OP BANK LTD.**

मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे – ४११ ०३३

जा.क्र.   दिनांक : २४/०१/२०१५

प्रिय सभासद बंधू/भगिनी

सप्रेम नमस्कार,

पाहता पाहता आपली प्रेरणा को-ऑप बँक लि. सुरू होऊन १६ वर्षे पुर्ण झाली. बँकेचे बालपण आम्हा सर्वा बरोबर आपण सुध्दा पाहिले व बँकेवर भरभरून प्रेम केलेत. अडीअडचणीच्या काळात आपण खंबीरपणे बँकेच्या पाठीमागे उभे राहीलात व बँकेस आर्थिक दृष्टया सक्षम बनविलेत. बँकेच्या प्रगती मधील सभासदांचा सहभाग लक्षात घेऊन गेल्या काही वर्षा पासून सभासदांसाठी एखादी कल्याणकारी योजना सुरू करावी अशी कल्पना मनात होती. सर्व संचालकांनी एकत्रितपणे या योजनेनस मूर्त स्वरूप देण्याचे ठरविले त्याप्रमाणे आपण सर्वानी बँकेच्या १६ व्या वार्षिक सर्व साधारण सभेत एकमुखाने मंजूरी दिल्यामुळे ही योजना बँकेच्या १६ व्या वर्धापन दिना निमित्त दि.२४/०१/२०१५ पासून कार्यान्वित करीत आहोत.

या योजनेची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे आहे. आपण सर्व सभासद/बंधू/भगिनीनीं या पूर्वी आमच्यावर जसा विश्वास दाखवलात व आम्हास कार्य करण्यास वेळ दिलेत तसाच विश्वास या पुढे सुध्दा सर्व संचालक मंडळावर राहील याची खात्री आहे.

आपणास व आपल्या कुटंबियास नववर्षाच्या शुभेच्छा !

आपले नम्र

**संस्थापक / अध्यक्ष - श्री.तुकारामभाऊ लक्ष्मणराव गुजर**   **उपाध्यक्षा - सौ.सुजाता विकास पारखी**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.श्रीधर धोंडीराम वाल्हेकर | श्री.गबाजी भिवाजी वाकडकर | श्री.ज्ञानेश्वर रामचंद्र खानेकर | श्री.कांतीलाल तुकाराम गुजर |
| श्री.अंकुश बबनराव प-हाड | श्री.सुरेश नानाभाऊ पारखी | श्री.लक्ष्मण महादेव काटे | श्री.संतोष वासुदेव मुंगसे |
| श्री.संजय संतुराम पठारे | श्री.ज्ञानेश्वर बाबुराव मुरकुटे | श्री.कालीदास तुकाराम गुजर | श्री.राजाराम नामदेव रंदिल |
| श्री.राजेंद्र महादेव शिरसाठ | सौ.चंद्रभागा शिवाजी भिसे | सौ.पदमिनी एकनाथ वराडे | श्री.नंदकिशोर जमनालाल तोष्णीवाल |

श्री.तानाजी माणिकराव सोनवणे - मुख्य कार्यकारी अधिकारी

## प्रेरणा को-ऑप बँक सभासद कल्याण निधी योजना

- **योजनेतील महत्त्वाचे मुद्दे :**

या योजने अंतर्गत पात्र सभासदांना व त्यांच्या कुटुंबियाना वैद्यकिय खर्चासाठी, अकस्मिक संकटासाठी योजनेच्या अटीनुसार आर्थिक सहाय्य केले जाते.

